Sinhgad Institutes

Sinhgad Technical Education Society's

SINHGAD SPRING DALE SCHOOL

(Recognised by Govt. of Maharashtra)

Index No. : 11.05.077

S. No. 19/15, Erandwane, Smt. Khilare Mark, Off Karve Road, Pune - 411 004.

**Tel. :** 020 - 2543 4302 E-mail : office.ssdse@sinhgad.edu Website : www.sinhgad.edu

Prof. M. N. Navale
M.E. (ELECT.), MIE, MBA
**FOUNDER - PRESIDENT**

Dr. (Mrs.) Sunanda M. Navale
B.A., M.P.M., Ph.D.
**FOUNDER - SECRETARY**

Mrs. Nirmala Sapkal
**PRINCIPAL**

Ref. : SSDS/E/23-24/30 Date : 08/12/2023

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)

पुणे जिल्हा परिषद, जि. पुणे

विषय:- नमुना २ साठी छायांकित प्रतीचा स्वीकार करणेबाबत.......

महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार सिंहगड स्प्रिंग डेल स्कूल, एरंडवणे या शाळेचा शैक्षणिक वर्ष २०१९ ते २०२२ व २०२२ ते २०२५ साठी बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफतवा सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांचा नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळा स्वमान्यता ( नमुना २ ) साठी आपल्या ई मान्यता प्रणाली मार्फत सदरचा प्रस्ताव दाखल करीत असून सदर मान्यता साठी लागणारी कागद पत्रे हि छायांकित प्रती मध्ये अपलोड करीत आहे.

सदर प्रस्तावासोबत जोडलेले सर्व कागदपत्रे हे वैध मार्गाने मिळवलेले आहेत व सर्व कागदपत्रे सत्य आहेत याची मी हमी देतो. सदरील शाळा अथवा संस्था हि कोणताही अनधिकृत शाळा अथवा वर्ग चालवीत नाही. ही शाळा किंवा संस्था सर्व शासकीय नियमाचे पालन हे जबाबदारीपूर्वक करीत आहे. शाळा मान्यता अथवा संस्था व्यवस्थापन यांचे संदर्भात न्यायप्रविष्ट बाब नाही याचीही मी हमी देत आहे. भविष्यात या संदर्भात विसंगती अथवा चुकीची व खोटी कागदपत्रे दिल्याचे निदर्शनास आल्यास याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापिका म्हणून माझी व संस्थेची राहील याची मला जाणीव आहे व होणाऱ्या कायदेशीर परिणामास मी जबाबदार राहीन.

सदर कागदपत्रांची मूळप्रत मिळत नसल्यामुळे किंवा नजर चूकीने गहाळ झाल्या कारणास्तव ही सत्यप्रत जोडत आहे तरी याचा स्वीकार करावा हि विनंती.

कळावे.

आपली विश्वासू,

मुख्याध्यापिका

PRINCIPAL
Sinhgad Spring Dale School
Erandvane, Pune - 411 004.

शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र शासन
पुणे-१. यांचे कार्यालय
- 1 JUN 2002
९०९२
आवक नोंदवही क्रमांक

क्र. : व्हीएलएस २००२/(४२२/२००२)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० मे, २००२

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे

**विषय : सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदान तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ४ शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००२ पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याबाबतचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थांना तात्काळ कळविण्यात यावा.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस २०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३ दिनांक.२१ जुले, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळांना शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळांना परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

(स्वाक्षरी)
( वि. व. चिदरकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहितीसाठी व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित
४) मा. राज्य शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
निवड नस्ती, प्राशि-३

(२००२-२००३ या वर्षी (जून २००२ पासून) इंग्रजी माध्यमाच्या ४ नवीन प्राथमिक शा-
ाळांना परवानगी देण्याबाबत शासनपत्र क्रमांक व्हीएलएस १००२/(४२२/२००२)/प्राशि-२,
दिनांक : २० मे, २००२ चे सहपत्र )

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | |
|---|---|---|---|
| | **जिल्हा - पुणे** | | |
| १. | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे | न-हे, ता.हवेली, जि.पुणे | म.न.प |
| २. | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे | कोंढवा (बु.), ता.हवेली, जि.पुणे | म.न.प |
| ३. | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे | कुसगांव, ता.मावळ, जि.पुणे | जि.प |
| ४. | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे | पिरंगुट, ता.मुळशी, जि.पुणे | जि.प |

विनाचे